ISSN 2320 - 4494
RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Resarch Journal

Volume :III Issue : II July to Sept.- 2018



ARTS | COMMERCE | SCIENCE | AGRICULTURE | EDUCATION | MANAGEMENT | MEDICAL | ENGINEERING & IT | LAW | SOCIAL SCIENCES | PHYSICAL EDUCATION | JOURNALISM | PHARMACY

Editor
**Sarkate Sadashiv Haribhau**
Email : powerofknowledge3@gmail.com, shsarkate@gmail.com

Power of Knowledge Peer Review Journal, Volume : III,Issue : II, July to Sept. -2018 ISSN 2320- 4494 Impact factor 2.7286


| | | | |
|---|---|---|---|
| 23 | वारकरी संप्रदायाची सांस्कृतिक पार्श्वभूमी व संतसाहित्य संशोधनाच्या दिशा | डॉ. बाळासाहेब दास | 78 |
| 24 | 'आवानओल' काव्यसंग्रहातून व्यक्त झालेली शेतकऱ्याची | प्रा.डॉ.गजानन जाधव | 82 |
| 25 | लालबाहादुर शास्त्री यांची राजकीय भूमिका | डॉ. राम प्र.तांदे<br>प्रा. अर्चना वाघमारे | 85 |
| 26 | स्त्री विमर्श : दशा और दिशा | डॉ. समीर गुलाब सस्त्रे | 89 |
| 27 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दलित साहित्य | नितिन भिमराव भालेराव | 92 |
| 28 | ग्रामीण भागातील अन्न शिजवण्याच्या पद्धती व आरोग्य | डॉ. वंदना नामदेव बनकर | 96 |
| 29 | पेशवे कालीन समाजातील स्त्रियांचे स्थान | प्रा. मोहन जगन्नाथ काळकुटे | 100 |
| 30 | शिवकालीन पोलीस व्यवस्था | ज्योती केशवराव कदम | 103 |
| 31 | भक्तीमार्गातून स्त्रीमनाची उकल करणारी संत जनाबाई | डॉ. मुंढे सविता गंगाराव | 107 |
| 32 | एकविसाव्या शतकातील मराठी ग्रामीण कादंबरीत प्रतिबिंबित समकालीन शिक्षणव्यवस्था | प्रा. डॉ. गणेश शिंदे, | 111 |
| 33 | यशवंतराव चव्हाण — तरूणांचे प्रेरणा | प्रा.डॉ.दिलीप कारभारी कसबे | 117 |




VIOL

INTRODUCTION :

3. Dowry abuse
4. Domestic violence
5. Eye teasing
6. Female genital mut
7. Foot binding
9. Forced abortion
10. Forced marriage
11. Forced pregnancy
12. Forced prostitution
13. Human trafficking
14. Marriage by abduc
15. Rapio
16. Sacred prostitution
a. Devada
b. Fetish s

Principal
C.S.M's Arts & Commerce College
Chakan, Tal-Khed, Dist-Pune.

# यशवंतराव चव्हाण :– तरूणांचे प्रेरणा स्थान

प्रा.डॉ.दिलीप कारभारी कसबे
मराठी विभाग प्रमुख
कला व वाणिज्य महाविदयालय
चाकण ता. खेड जि. पणे

महाराष्ट्राच्या जडणघडणीत ज्या लोकांचा वाटा आहे त्यात यशवंतराव चव्हाण मोलाचे योगदान आहे.संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, राष्ट्रीय कॉंग्रेस इ. महाराष्ट्राच्या इतिहासात त्यांना अनन्य साधारण महत्त्व आहे. त्यांनी राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आर्थिक शैक्षणिक वैचारिक क्षेत्रात आपला स्वतंत्र आणि अविस्मरणीय असा ठसा उमटवला आहे. त्यांच्या लेखनातून आणि भाषणतून व्यक्त झालेले विचार त्यांचे जगणे फार मोलाचे आहे. म्हणून सध्याच्या समाज माध्यमात अडकून पडलेल्या तरूण वर्गाला यशवंतराव चव्हाण यांचे व्यक्तीमत्त्व प्रेरणादायीच ठरेल. एका सामान्यातल्या सामान्य कुटुंबात जन्माला आलेल्या वडिलांचे छत्र हरवलेल्या यशवंतराव चव्हाण यांनी अपार कष्ट व परीश्रम करून सर्व संकटांना सामोरे जावून यशाचे अतिशय उंच शिखर गाठले आमदार ते संरक्षण मंत्री कूशल प्रशासक ते संघटक आणि सामान्य व्यक्ती सुध्दा जीवनात यशस्वी होऊ शकतो, हे आपल्या स्व:कर्तृत्वाने दाखवून दिले.यशवंतराव चव्हाण यांच्या साहित्यातून त्यांच्या व्यक्तीमत्त्वाची जडणघडण कशी झाली हे सहज लक्षात येते कारण त्यांचे लेखन इतके साधे, सोपे, सरळ, व सुटसुटीत आहे की सामान्यातल्या सामान्य तळागाळातील व्यक्ती सुध्दा वाचू शकेल. नशिबाने मिळलेल्या परिस्थितीला दोष देण्यापेक्षा परिस्थितीला सामोरे जावून परिस्थितीशी सामना करून आपल्या जीवनात बदल घडविला. साहित्य माणसाच्या जीवनाचा आरसा असतो. मानवी जीवनातील आणि जगण्यातील संपूर्ण प्रतिबिंब साहित्यात पडते. यशवंतराव चव्हाण यांच्या कृष्णाकाठ, (आत्मचरित्र) भूमिका, (भाषणसंग्रह) युगांतर, (भाषणसंग्रह) ऋणानुबंध, (लेखसंग्रह) सह्याद्रीचेवारे, (भाषणसंग्रह) विदेश दर्शन, (संपा.लेखसंग्रह) विचारधारा, (संपा.भाषणसंग्रह) शिवनेरीच्यानौबती, (संपा.भाषणसंग्रह) इ. पुस्तकातून व त्यांच्या जीवनावर इतर व्यक्तींनी लिहीलेल्या पुस्तकांमधून काव्यातून लेखातून त्यांचे व्यक्तीमत्त्वाचे दर्शन घडते.

यशवंतराव चव्हाण यांना शाळेत असतांनाच सामाजिक कार्याचे वेड लागले होते. लहानपण पासूनच विविध कार्यक्रमांचे आयोजन ते करत असत. त्यांचे वडिल बंधू गणपतराव यांच्या कडून सामाजिकतेचे धडे मिळाले. फुले आणि टिळक योच्या वाचनाची सुरूवात त्यांच्या पासूनच झाली. ग्रामीण पार्श्वभूमी आणि सांस्कृतिक जीवन कळावे म्हणून गणेश उत्सव व शिवजयंती या सारखे कार्यक्रम समाजासाठी सुरू केले. या उत्सवासाठी भजनाचा कार्यक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम, व्याख्यानाचे आयोजन अशा प्रकारचे कार्यक्रम घेतले. सांस्कृतिक कार्यक्रमांना व भजनाच्या कार्यक्रमोना लोक खूप येत असत पण व्याख्यानाला मात्र लोक येत नसत. तरीही समाज हितासाठी, समाजाच्या संपर्कसाठी असे कार्यक्रम त्यांनी सातत्याने घेतले आणि यशस्वी करून दाखविले. अशा प्रकारच्या कार्यक्रमांच्या माध्यमातूनच आपण समाजापर्यंत पोहचू शकते. ग्रामीण सर्व कर्यक्रमात ते सक्रिय होते. तमाशा पाहणे, जत्रेतील कुस्ती, नाटकात अभिनय करणे(माईसाहेब व प्रेमसंन्यास या नाटकात यशवंतराव चव्हाण यांनी भूमिका केल्या.) इ. छंदही जोपासले. त्यांनी ग्रामीण समाज जवळून पाहिला होता.ग्रामीण समाजाशी आणि लोकसंस्कृतीशी त्यांचा थेट संबंध होता. अवतीभोवती असणा–या सर्व जातीच्या समाजाचा



Principal
C.S.M's Arts & Commerce College
Dist-Pune.